# श्री राम चंद्र मिशन
# एकोज इंडिया

मार्च 2009 | केवळ खाजगी वितरणाकरिता | खंड 2 अंक 2


नमस्कार. हे वृत्तपत्र आता देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचले आहे आणि ते बरेच अभ्यासी वाचत आहेत हे पाहून आम्हाला अतिशय आनंद होत आहे. विभिन्न विभागातून लेखांचा प्रवाह सतत वाढतोच आहे आणि वृत संकलित करतांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांमध्ये गुरुदेव बरेच व्यस्त होते. या दरम्यान ते सतत दौऱ्यावर होते आणि या वृत्तपत्राचे संकलन होईपर्यंत त्यांचा उत्तर भारताचा दौरा सुरुच होता.

या आवृत्तीमध्ये पूज्य लालाजींचा जन्मसमारोह, विभाग/केंद्र प्रमुखांचे सम्मेलन, अनेक अभ्यासी प्रशिक्षण शिबिरे, मूल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण शिबिरे आणि बंगलोर येथील युवामंच शिबिर याविषयीचे काही लेख सामाविष्ट आहेत. शहाजहाँपूरच्या आश्रमाची माहिती हे 'प्रकाशाची केंद्रे' या विभागाचे प्रमुख आकर्षण आहे. 30 एप्रिल रोजी प्रकाशित होणारी 'Whispers from The Brighter world' ची दुसरी आवृत्ती ही गुरुदेवांकडून आपल्याला मिळालेली आणखी एक भेट आहे.

मे 2009 च्या आवृत्तीसाठी लेख स्विकारण्याची अंतिम तिथी 15 एप्रिल 2009 आहे. आपल्या विभागातील कार्यक्रमांचे वृत्तांत छायाचित्रांसहीत आपल्या संबंधित विभाग प्रमुखांमार्फत पाठवणे आवश्यक आहे.

प्रेमळ शुभेच्छांसह,
संपादकीय मंडळ.

## गुरुदेवांचा प्रवास – जानेवारी व फेब्रुवारी 2009

पोंगल उत्सवादरम्यान गुरुदेव चेन्नई येथे होते आणि बऱ्याच अभ्यासींनी या सुट्ट्यांमध्ये मणपक्कम आश्रमाला भेट दिली. या उत्सवामध्ये गुरुदेवांनी बरेच विवाह संपन्न केले. 19 जानेवारी रोजी ते रामापुरम येथे आले. (1991 मध्ये त्यांनी येथील आश्रमाचे उद्घाटन केले होते.) येथील सत्संग संपवून त्यांनी येथून एका तासाच्या अंतरावर असणाऱ्या चित्तुर येथे प्रयाण केले. तेथे पोहोचल्यावर त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या सुमारे 1100 अभ्यासींसमवेत सत्संगाचे आयोजन केले. त्यानंतर त्यांनी त्यांच्यासाठी बनविलेल्या कॉटेजचे उद्घाटन केले. अनौपचारिकपणे मृत्युबद्दल बोलताना त्यांनी त्याची तुलना रेल्वे प्रवासींशी केली. ज्याप्रमाणे काही प्रवासी उतरून जातात आणि नवीन प्रवासी चढतात आणि आपण त्यापैकी कोणाचीच काळजी करीत नाही. त्याचप्रमाणे, जेव्हा कोणी जवळची व आवडती व्यक्ती मृत पावते तेव्हा अशारितीने त्याला सामोरे गेले पाहिजे कि ज्यामुळे अभ्यासींच्या आंतरिक शांततेला आणि शुद्धतेला झळ पोहोचणार नाही.

एका छोट्या विश्रांतीनंतर गुरुदेवांनी आणखी एक सत्संगाचे संचालन केले व एक भाषण ही दिले ज्यामध्ये त्यांनी सर्वांना होणारे बदल स्वीकारण्यास व त्यासाठी ध्यान करण्याविषयी आग्रहाने विनवून सांगितले. 20 तारखेला सकाळी गुरुदेवांनी सत्संगाचे आयोजन केले व त्यानंतर ते तिरुपतीसाठी रवाना झाले.

तिरुपतीला पोहोचल्यानंतर त्यांनी जमलेल्या सुमारे 1500 लोकांसमवेत सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर एक भाषणही केले. आपल्या कॉटेजमध्ये ते एकोज इंडिया चा जानेवारीचा अंक पाहताना अतिशय आनंदी आणि प्रसन्न होते. त्या अंकात प्रकाशित झालेल्या छायाचित्रांमुळे त्यांच्या जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला. दुपारच्या जेवणानंतर ते चित्तूरला गेले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ते चेन्नईला परतले.








गुरुदेव दि. 23 जानेवारी रोजी अहमदाबादला पोहोचले. 24 तारखेला सकाळी अडलज आश्रमामध्ये जेव्हा गुरुदेव ध्यानमंदिराकडे जात होते तेव्हा तेथे त्यांच्या बऱ्याच आधी येऊन बसलेल्या अभ्यासींनी पाळलेली निशब्द शांतता आवडली. ध्यानानंतर भगिनी रंजना मेहता यांनी आपल्या मंजुळ स्वरांमध्ये काही भजने सादर केली. गुरुदेव सायंकाळी थोडा विश्राम करतील असे आम्हाला वाटले होते परंतु आमच्या अपेक्षेविपरीत त्यांनी या भेटीदरम्यान ते 5 सिटींग्ज देतील असे जाहीर केले. त्यामुळे अभ्यासी आणि कार्यकर्त्यांना एक स्पष्ट संदेश मिळाला की आपण आपल्यामध्ये मिशनच्या कामाविषयी तत्परतेची भावना जागृत करणे आवश्यक आहे आणि आपल्या जीवनातील अध्यात्मिकतेचे महत्वाचे स्थान ओळखले पाहिजे.





26 तारखेला सत्संग संपल्यावर गुरुदेवांनी गुजराती युवकांनी प्रस्तुत केलेला गरबा आणि रास (गुजराती पारंपारिक नृत्य) पाहिला. त्यानंतर त्यांनी गुजरात व शेजारील राज्याच्या सुमारे 140 प्रशिक्षकांची बैठक घेतली. यामध्ये गुरुदेवांनी सिटिंगतर दिलीच पण त्याचबरोबर एक भाषणही दिले. गुरुदेव खूप थकले होते त्यामुळे संपूर्ण संध्याकाळ त्यांनी विश्रांती घेतली.

गुरुदेव 27 तारखेला दुपारी दिल्लीला पोहोचले, 28 तारखेला सकाळी विभागीय आश्रमाला भेट देऊन त्यांनी सत्संगाचे संचालन केले. यावेळी 2500 उपस्थितांपैकी एका अभ्यासीचा भ्रमणध्वनी (मोबाईल) वाजला सत्संग संपल्यावर गुरुदेवांनी ज्याचा फोन वाजला होता त्याला व्यासपीठाजवळ येऊन इतर अभ्यासींची माफी मागण्यास सांगितले. दि 29 रोजी ते सतखोलसाठी रवाना झाले.




जानेवारी 29 रोजी गुरुदेव मुरादाबादला पोहोचले. शेकडो अभ्यासी गुरुदेवांच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा रांगेत उभे होते. त्या रात्री गुरुदेव रुद्रपूर येथे राहिले आणि 30 तारखेला अल्पोपहारानंतर ते सतखोलसाठी रवाना झाले.

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया



मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2

सतखोल मध्ये गुरुदेवांचे स्वागत एका सुंदर गीताने करण्यात आले. अत्यंत खडतर अश्या प्रवासानंतरदेखिल गुरुदेवांनी अभ्यासींशी रोचक संभाषण व विनम्र विचारपूस करीत थोडा काळ व्यतीत केला. हिंदू कालनिर्णयानुसार 31 जानेवारी रोजी लालाजींचा वाढदिवस होता. "हा पवित्राहून पवित्र बसंत आहे", असे गुरुदेव म्हणाले. एका अभ्यासीने त्यांना पर्वतीय प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण अशी एक टोपी भेट दिली. त्यांनी ती टोपी खूपच उत्साहाने परिधान केली व वारंवार तिला व्यवस्थित करीत होते.





दि. 1 फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी विवेकानंद स्मारकासाठी प्रसिद्ध असलेल्या अलमोराला भेट दिली. तेथून जाताना ते म्हणाले," मी येथे 1958 मध्ये ध्यान केले होते. सहजमार्गामध्ये येण्याच्या 6 वर्षआधी. मला खात्री आहे की या जागेला स्वामी विवेकानंदांचा चरणस्पर्श झालेला आहे." एका अभ्यासीच्या घरी दुपारच्या जेवणानंतर गुरुदेवांनी त्यांची वाट पहात असलेल्या इतर अभ्यासींसमवेत काही काळ व्यतीत केला. एक विद्यार्थ्याला जाणून घ्यायचे होते की जास्त महत्वाचे काय आहे: अभ्यास की ध्यान. "विद्यार्थ्याने अभ्यासावरच लक्ष दिले पाहिजे." एका भगिनीने शंका विचारली की ती आपल्या पतीस कशाप्रकारे ध्यान करावयास लावू शकते. "त्यांच्यावर बळजबरी करु नका. तुमच्या साधनेद्वारे स्वत:चे एका परिपूर्ण व्यक्तिमत्वात रुपांतर करा जेणेकरून तुमचे पती तुमचे अनुकरण करु पाहतील."




दि. 2 फेब्रुवारी हा पाश्चिमात्य कालगणनेप्रमाणे लालाजीमहाराजांचा वाढदिवस होता. सत्संगानंतर लगेचच एका अभ्यासीला काहीतरी करतांना पाहून गुरुदेव म्हणाले, " आपल्याला आपल्या अवस्थेवर लक्ष दिले पाहिजे, ध्यानानंतर लगेचच कुठलीही क्रिया करु नये". त्यांनी लालाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक DVD प्रसिद्ध केली. आणि सहजमार्ग गुरुपरंपरेवर आधारित एक नाटिका पाहिली. त्यांनी Whispers from the brighter world च्या दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाविषयी एक भाषण दिले. दि. 3 फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी अतिशय प्रेक्षणीय अश्या नौकुचियातालला भेट दिली. गप्पांमध्ये अनौपचारिकरित्या ते म्हणाले कि नेहमी चेहऱ्यावर रागीट भाव असणाऱ्या व्यक्तिंना टाळावे. संतांच्या चेहऱ्यावर नेहमी प्रसन्न भाव असावा. योग्य व्यक्तिवर निष्ठा, योग्यवेळी प्रामाणिकपणा आणि सचोटी या गोष्टी अध्यात्मिकतेचे पालन करण्यामध्ये खूप कामी येतात.

दि. 5 फेब्रुवारी रोजी दिल्लीच्या वाटेवर हापूर येथे गुरुदेवांनी आश्रमाचे उद्घाटन केले.




दि. 7 फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी सोनेपत आश्रमाचे उद्घाटन केले. ते त्यावेळी खूपच आनंदी दिसत होते. सत्संग संपल्यावर त्यांनी भाषण दिले ज्यामध्ये ते म्हणाले कि, "मौन हीच ईश्वराची भाषा आहे आणि प्रेमाला कोणतीच भाषा नसते. शिस्तीशिवाय प्रेम असूच शकत नाही आणि अध्यात्मिकतेशिवाय शिस्त असू शकत नाही." याच सत्याला दुजोरा देत ते म्हणाले कि," प्रेमाचे कोणतेही रूप वा धर्म नसतो आणि त्याचमुळे फक्त भेदभाव मिटवूनच आपल्या हृदयामध्ये विश्वबंधुत्व व प्रेमाची ज्योत जागवणे शक्य आहे." बंधु गुरुप्रीत यांनी जेव्हा काही भक्तिपूर्ण भजने सादर केली तेव्हा त्यांच्या सुमधूर आवाजाने सारी सभा मंत्रमुग्ध झाली.

दि. 8 फेब्रुवारी रोजी गुरुदेवांचे जयपुर येथे आगमन झाले. अभ्यासी गुरुदेवांची एक झलक पाहाण्यासाठी रांगेत उभे होते आणि गुरुदेव आल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहात होता. 10 तारखेला सकाळी गुरुदेवांच्या आधीच येऊन बसलेल्या सुमारे 2300 अभ्यासींसमवेत गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. काही अभ्यासी आपल्या मुलांचे नामकरण करण्यासाठी मुलांना घेऊन आले तेव्हा ते म्हणाले कि यापुढे ते एकाच अटीवर मुलांचे नामकरण करतील आणि ती म्हणजे मुलाचे पालक त्यांनी दिलेल्या नावापुढे त्यांच्या जातीचे नाव किंवा आडनाव लावणार नाहीत. एका अभ्यासी भगिनीने जेव्हा सांगितले कि तिचा पती मिशनमध्ये नाही तेव्हा ते म्हणाले की तो जरुर येईल. नकारात्मक विचारांच्या प्रभावानेच या गोष्टींना उशीर होतो. त्यांना आपल्या बरोबर घेऊन येत जा.



11 तारखेला सकाळी सत्संगानंतर महाभारतातील "लक्ष्य" या विषयावर आधारित एक नाटिका प्रस्तुत केली गेली. एका अनौपचारिक संभाषणामध्ये त्यांनी सांगितले कि, 'पुर्वनिर्धारित आयुष्य' असे काही नसते. म्हणजे सर्वकाही घडू शकते परंतु काय घडावे हे आपल्या ईच्छाशक्तिवर अवलंबून असते.

12 तारखेला दुपारी जयपूरहून गुरुदेव दिल्लीच्या विभागीय आश्रमात आले. त्यांनी त्यादिवशी सायंकालीन सत्संगाचे संचालन केले. यावेळी संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण पसरले होते.

यावेळी प्रथमच गुरुदेवांनी आपल्या कॉटेजमध्ये रात्री वास्तव्य केले. त्यांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले व दुपारी ते भोपाळसाठी रवाना झाले. दि. 15 फेब्रुवारीला त्यांनी भोपाळ येथे ध्यानमंदिराचे उद्घाटन केले. येथील आश्रम भोपाळपासून 15 कि.मी. अंतरावर असणाऱ्या आदमपूर छावणी या छोट्याश्या गावात आहे. सत्संग झाल्यावर त्यांनी दोन विवाह संपन्न केले. त्यानंतर ते इंदौर येथे रवाना झाले. दि. 16 रोजी त्यांनी इंदौर आश्रमातील ध्यानगृहाचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना बंधू अजय भट्टर म्हणाले "आश्रमाचा उपयोग ध्यानासाठी, "त्यां"ना आपल्या आतमध्ये शोधण्यासाठी व गुरुदेवांनाच आपले एकमेव लक्ष्य बनविण्यासाठी केला गेला पाहिजे." भविष्यामध्ये जास्तीत जास्त लोक अध्यात्मिकतेचा स्विकार करतील असेही त्यांनी आवर्जून सांगीतले. सुमारे 800 लोकांच्या बसण्याची क्षमता असलेला हा आश्रम मुख्य शहरामध्येच वसलेला आहे. 18 तारखेला सकाळी गुरुदेवांनी मुंबईकडे प्रयाण केले. तेथे त्यांनी एक दिवस मुक्काम केला व पुढील प्रवासाला निघण्यापूर्वी त्यांनी 19 तारखेला कलकत्ता येथे विश्रांती घेतली.

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
मुख्यालयातील बातम्या
मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2

## निबंध लेखन स्पर्धेचा निकाल




देशभरातील सुमारे 75000 स्पर्धक विद्यार्थ्यांच्या 2008 च्या निबंधलेखन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. हिंदी व इंग्रजी व्यतिरिक्त इतर अनेक प्रादेशिक भाषांमधून ही स्पर्धा घेण्यात आली होती. कनिष्ठ वर्गासाठी विषय होता 'सत्य हेच धैर्य होय' आणि वरिष्ठ वर्गाचा विषय होता 'आत्मसन्मान आणि आत्मविश्वासाने चारित्र्य निर्माण होऊ शकेल'.


इंग्रजीमधील कनिष्ठ वर्गाचे विजेते आहेत – आकांक्षा (पुणे), अमल (दिल्ली), सुषमा (हैद्राबाद), अर्हुन (वदगारा, केरळ), देबोप्रिया (रांची), दिव्या (गाझीपुर, उ.प्र.), नैना (मोहाली), सानिका (नाशिक) आणि सिद्धांत(शक्तीनगर, उ.प्र.).

वरिष्ठ वर्गाचे विजेते आहेत – अनुराधा (नैनिताल), नरेश (जयपुर), समीना (इंदौर), अनूप (नामक्कल, तामिळनाडू), दिव्या (नोईडा), इशिका (कुल्लु, हिमाचल प्रदेश), कीतन (चेन्नई), स्नेहल (पुणे) आणि वरुण (जालंधर).




## नवीन प्रकाशने

### लालाजींचे जीवनचरित्र: DVD संच व पुस्तक




लालाजीमहाराजांच्या जन्मदिनाच्या शुभप्रसंगी: Life of Lalaji हा DVD संच प्रस्तुत करताना आम्हाला अत्यानंद होत आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी पुणे केंद्राच्या अभ्यासींनी लालाजींचे जीवनचरित्र आणि त्यांच्या शिकवणींवर आधारित एक चित्रपट तयार केला व त्याची व्हिडिओ कॅसेट तयार केली होती. या लोकप्रिय चित्रपटाला असलेल्या सततच्या मागणीला मान देऊन लालाजी महाराजांची दुर्मिळ छायाचित्रे असणाऱ्या पुस्तकासहीत या डिव्हीडीचे पुन:प्रकाशन करण्यात येत आहे.

### सहजमार्ग पुस्तिका




ही पुस्तिका अध्यात्मिकतेच्या इच्छुकांसाठी सहजमार्ग ध्यानपद्धतीविषयी उत्तम अशी माहिती देणारी ठरेल. ही सहज मार्गामध्ये येऊ इच्छिणाऱ्या सर्व होतकरुंना देण्यासाठी प्रमाणित अशी माहिती पुस्तिका आहे. यात सहजमार्गाच्या तत्वांविषयी आणि स्थानीय संपर्काबाबत माहिती दिली आहे आणि सहजमार्गाच्या माहितीसत्रामध्ये ही पत्रिका दिली जाऊ शकते.



## मिशनच्या भारतामधील कार्याचा आढावा

पोंगल या तामिळनाडूच्या सुगीच्या सणाच्या एक आठवड्याआधीपासूनच चेन्नईच्या बाबूजी मेमोरियल आश्रमामध्ये बऱ्याच घडामोडींना उधाण आले होते. मिशनचे देशभरातील सुमारे 200 प्रमुख कार्यकर्ते ज्यामध्ये कार्यकारी मंडळाचे सदस्य, विभागीय प्रमुख, केंद्रीय प्रमुख हे सर्व त्यांच्या कार्याचा सखोल आढावा घेण्यासाठी दि. 10 ते 12 जानेवारी 2009 या तीन दिवसांकरिता एकत्र जमले होते.

10 तारखेला गुरुदेवांनी विभागीय प्रमुखांना संबोधित केले आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी पुन्हा संपूर्ण समुहास संबोधित केले. या दोन्हीवेळेस त्यांनी मिशनमधील शिस्तीच्या खालावणाऱ्या दर्जाविषयी दु:ख व्यक्त केले. ते म्हणाले कि, जर शिस्तीकडे दुर्लक्ष झाले तर ते संस्थेचा एक अंग कापून टाकण्यासारखे आहे. 1966 मध्ये बाबूजींनी खेदपूर्वक जाहीर केले की जाती आणि धर्माच्या पलीकडे जाऊन मी सर्व अभ्यासींना एकत्र आणण्यात अयशस्वी ठरलो व आज या गोष्टीला चार दशके उलटून गेल्यावरसुद्धा मिशनमधील जातीय भेदाभेद नष्ट झालेला नाही.

गुरुदेव म्हणाले कि, जेव्हा आपण गुरुदेवांवर दैवीय प्रेम करण्यास समर्थ नसतो त्यावेळेस त्यांची सेवा करुन आपण त्यांची कृपा प्राप्त करुन घेऊ शकतो, हा आपणांस उपलब्ध असणारा सोपा मार्ग आहे.

एकंदरीत, आपल्या बाह्यरंगामध्ये न झालेल्या बदलाचे विश्लेषण, ज्याचा उल्लेख त्यांनी वारंवार आपल्या अलीकडील भाषणांमध्ये व वक्तव्यांमध्ये केला होता, गुरुदेवांकडून ऐकणे हा एक वेदनादायक अनुभव होता.

केंद्रीय प्रमुखांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये केंद्राचे कार्यव्यवस्थापन, हिशोब, प्रकाशने, सुरक्षा, सभासद व्यवस्थापन आदी विषयांवर सादरीकरण करुन उपस्थितांना त्याविषयी अवगत करण्यात आले. सर्व सहभागींनी प्रस्तुतकर्त्यासमवेत झालेल्या उपयोगी चर्चेद्वारे आपले शंका निरसन करुन घेतले. अशा प्रकारचा कार्यक्रम दर दोन वर्षांनी करण्याचे ठरले आहे.




## विशेष प्रकाशन

30 एप्रिल 2009 रोजी "Whispers from The Brighter World -A Second Revelation" प्रकाशित होईल.

याची एक खास प्रत स्वत:साठी अल्पश्या ऐच्छिक दानाद्वारे प्राप्त करण्याची संधी गुरुदेवांनी उपलब्ध करुन दिली आहे. अधिक माहितीसाठी कृपया आपल्या स्थानिक "SRCM" कार्याधिकाऱ्याशी संपर्क साधावा.

# पूज्य लालाजी महाराज जयंती समारोह



## अलुवा, केरळ

अलुवा केंद्राने एक पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले, ज्यामध्ये सकाळी 9 व सायंकाळी 5 वाजता सत्संगाचे आयोजन केले गेले होते. यावेळी पूज्य लालाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक चित्रफित दाखविण्यात आली ज्यामध्ये आपल्या या महान गुरुंनी मांडलेली सहजमार्गाची तत्वे समाविष्ट होती. ही चित्रफित हिंदी भाषेत असल्याने ती सर्व अभ्यासींना समजावी म्हणून त्याचा मल्याळम भाषेत अनुवाद करण्यात आला. मध्यंतरामध्ये हा अनुवाद जमलेल्या सर्व लोकांना समाधानकारकरित्या वाचून दाखविण्यात आला. ह्यामुळे प्रत्येकाला गुरुदेवांच्या सतत स्मरणात राहाण्यास मदत झाली जो ह्या कार्यक्रमाचा मूळ उद्देश होता.

## गुलबर्गा, कर्नाटक

गुलबर्गा जिल्ह्यातील अनेक भागातून आलेल्या अंदाजे 280 अभ्यासी आणि 70 मुलांनी ह्या एक दिवसीय कार्यक्रमात भाग घेतला. समारोहाच्या एक दिवस आधीपासूनच अभ्यासी येऊ लागले होते आणि तेथे त्यांच्या भोजन व रात्रीच्या निवासाची सोय करण्यात आली होती. 2 फेब्रुवारीला सकाळी 9 वाजता सत्संगाचे आयोजन करण्यात आले. न्याहारीनंतर पूज्य लालाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक चित्रफीत दाखविण्यात आली. दुपारचे भोजन झाल्यानंतर लहान मुलांचा गाणी, कविता आणि अभ्यासींचा भक्तीपर गीते असलेला कार्यक्रम सादर करण्यात आला. सायंकाळचा सत्संग 5 वाजता झाला. संपूर्ण दिवस वातावरणात ईश्वरीय कृपेचा ओघ वाहत असल्याचा अनुभव येत होता आणि ही गोष्ट अनेक अभ्यासींनी व्यक्त केली. हा कार्यक्रम साधेपणाने आणि प्रेमपूर्वक आयोजित करण्यात आला आणि सर्व अभ्यासींनी वाखाणला.

## व्ही.जी.टी, आंध्र प्रदेश

गुंटूर जिल्ह्यातील काझीपेट येथील समारंभाचे आयोजन नव्यानेच संपादन केलेल्या (50 एकर) जमिनीवर बांधलेल्या विभागीय आश्रमात करण्यात आले. आसपासच्या उपकेंद्रांमधुन सुमारे एक हजाराहून जास्त अभ्यासी आणि मुलांची या कार्यक्रमास उपस्थिती होती.

सकाळच्या सत्संगानंतर लालाजी महाराजांच्या चरित्राचे आणि त्यांच्या शिकवणूकीचे वाचन झाले. लहान मुलांनी चित्रकला, वकृत्व आणि छोट्या नाटिका सादर करून सहजमार्गाचे मूलतत्व अधोरेखित केले. ते प्रेरणादायी आणि पुढच्या पिढीवर झालेल्या सखोल प्रभावाची साक्ष देणारे होते त्याचबरोबर आध्यात्मिक उत्क्रांतीचे वचन होते. मिशनचे संयुक्त सचिव बंधू ए पी दुराई यांनी यामध्ये सहभाग घेऊन अभ्यासींना प्रेरणा देण्याचे कार्य केले. त्यांनी सायंकालीन सत्संगाचे संचलन केले व त्यानंतर झालेल्या प्रशिक्षकांच्या बैठकीचे अध्यक्षपददेखील भूषविले.

## कटक, ओरिसा

ओरिसा विभागातील सर्व केंद्रांमधील सुमारे 160 अभ्यासींच्या सहभागाने दोन दिवसीय समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.

1 फेब्रुवारीला सत्संग झाल्यानंतर गुरुदेवांच्या भाषणातील प्रमुख मुद्यांवर उदा. मिशनची वाढ, जागतिक मंदीचे परिणाम, मिशनच्या कार्यामध्ये सुधारणा, अभ्यासींच्या मोठ्या प्रमाणावरील सहभागास प्रोत्साहन यावर चर्चा झाली.

2 फेब्रुवारीला सत्संगानंतर झालेल्या भाषणांत लालाजींनी महत्वाची मानलेली व सहजमार्ग साधनेचा अविभाज्य भाग असलेली तत्वे यावर भाषणे झालीत. यावेळी स्वयंशिस्त, दुसऱ्यांची निरपेक्ष सेवा, आपल्या आंतरिक रुपांतरणात गुरुदेवांना मदत करण्यासाठी स्वत:ला तयार करणे या गोष्टींवर सुद्धा चर्चा झाली.

पुढील सत्रात अभ्यासींनी गुरुदेव व मिशनविषयी श्रद्धा कशी विकसीत करावी व आत्मनिरीक्षण कसे करावे यावर आपले स्वानुभव कथन केले. सायंकाळी लहान मुले व काही तरूण अभ्यासींनी एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सर्व अभ्यासींनी वातावरणात त्या जागेवर असलेल्या दैवी कृपेचा अनुभव घेऊन त्याचा लाभ घेतला.

## मुंबई , महाराष्ट्र

मुंबई केंद्रातील अभ्यासी मोठ्या संख्येने व अतीव उत्साहाने या कार्यक्रमास हजर होते. रविवारी सकाळी कार्यक्रमाची सुरुवात ध्यानाने झाली. त्यानंतर भजने, लालाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे वाचन आणि लालाजींच्या शिकवणूकीनुसार अभ्यासींची कर्तव्ये यावर भाषणे झाली. दुपारी युवकांनी सादर केलेल्या ’ मध्यपूर्वेतील सूफी संत ’ या नाटिकेने सर्वांना प्रेरणा दिली.

2 फेब्रुवारीला सकाळच्या ध्यानानंतर भगिनींनी भजने आणि मुलांनी नाटिका सादर केल्या. सर्वांनी लालाजी महाराजांच्या शिकवणूकीचे आचरण करावे या उद्देशाने त्यांच्या जीवनावर आधारित चित्रफित दुपारी दाखविण्यात आली. या दोन दिवसांच्या कार्यक्रमाची सांगता सायंकालीन ध्यानाने झाली यावेळी घरी परत जाताना प्रत्येकजण या भारलेल्या वातावरणातून जणू ऊर्जा घेउनच बाहेर पडला.

## अहमदनगर, महाराष्ट्र

महाराष्ट्रातील अनेक केंद्रातून आलेले सुमारे 216 अभ्यासी ह्या पवित्र दिवशी कार्यक्रमास ऊपस्थित होते. सकाळच्या सत्संगानंतर लालाजी महाराजांच्या स्मरणार्थ भजने, लहान मुलांच्या नाटिका, चर्चासत्रे, भाषणे यांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर अहमदनगर परिसरातील अध्यात्मिकतेच्या शोधात असलेल्या नगरवासीयांसाठी खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये शिरवळचे बंधू आर डी कुलकर्णी आणि साताऱ्याच्या भगिनी काळे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचा उद्देश अगदी नेमक्या शब्दात बंधू सुभाष वैद्य यांनी सांगितला, "आपल्याला जे आपल्या प्रिय गुरुदेवांकडून मिळाले आहे ते आपण खुल्या दिलाने सर्वांमध्ये वाटले पाहिजे तरच आपल्यावर गुरुकृपेचा ओघ कायम राहील."

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2





## ध्यानगृहाचे उद्घाटन – वलसाड, गुजराथ.

पूज्य लालाजी महाराजांच्या जयंतीचे निमित्त साधून बंधू श्री.सी राजगोपालन यांनी वलसाडच्या ध्यानगृहाचे उदघाट्न केले. हा दिवस म्हणजे वलसाड आश्रमातील रविवारच्या सत्संगाची सुरुवात ठरली. दक्षिण गुजरातच्या विविध केंद्रातून सुमारे 300 अभ्यासींनी आपली उपस्थिती नोंदविली. या वेळी लालाजी महाराजांवर चित्रफित दाखविण्यात आली व याबरोबरच अभ्यासी बंधूंची भाषणे व प्रशिक्षकांची बैठक संपन्न झाली.

वलसाडचा हा आश्रम अंदाजे दीड एकर जमिनीवर वसलेला असून तो वलसाड धरमपूर राज्य महामार्गाच्या जवळ तसेच मुंबई आणि दिल्लीला जोडणाऱ्या राष्ट्रिय महामार्ग क्र. 8 पासून चार कि.मी. अंतरावर आहे. येथील ध्यानगृहात 250 अभ्यासी सामावले जाऊ शकतात. आश्रमात लहान मुलांसाठी जागा, साठवणीची खोली,शौचालय तसेच सुरक्षा रक्षकांसाठी खोलीही आहे.

वलसाड आश्रमात हा समारंभ होण्याआधी सुरत, नवसारी, वापी अशा जवळच्या केंद्रांमध्ये सत्संग आयोजित करण्यात आले. सत्संगा नंतर भाषणे व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला.

## प्रीफेक्ट ट्रेनिंग प्रोग्राम (पी टी पी) तुकडी क्र. 1

मलमपुझ्झा रिट्रीट केंद्रात झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात 2 बी या दक्षिणेतील तामिळनाडू विभागातून आलेले प्रशिक्षक पहिल्या तुकडीत होते. 46 प्रशिक्षकांनी यात भाग घेतला.

या कार्यक्रमात आध्यात्मिक प्रशिक्षकांसाठी आवश्यक गोष्टी, प्रशिक्षकाचे कार्य, संघकार्य आणि ऐक्य आदी विषय हाताळले गेले. हे सर्व विषय अत्यंत काटेकोरपणे तयार करुन अतिशय प्रेम व काळजीपूर्वक सादर केले गेले. सर्वांचा प्रामाणिकपणा आणि ग्रहणशक्ती उत्तम असल्यामुळे सत्र अतिशय परिणामकारक झाले.

मलमपूझ्झा रिट्रिट केंद्रातले वातावरण आणि सोयी सुविधा अत्युत्तम आणि अश्या कार्यक्रमांसाठी बनविल्या होत्या.

प्रशिक्षण कार्यक्रम जवळ जवळ 10 तास चालला ज्यात भोजन आणि चहापानासाठी पूरेसा वेळ दिला गेला. या दोन दिवसात जे काही घडले त्यासाठी, त्यांचे प्रेम, परवानगी आणि दिव्य उपस्थिती ज्यामुळे हे सर्व शक्य झाले सर्वांनी त्यांचे हृद्‌यापासुन आभार मानले.

## केरळ येथील प्रशिक्षक शिबीर , अलुवा

केरळमधील सर्व प्रशिक्षकांचे शिबीर अलुवा येथे 31 जानेवारी ते 1 फेब्रुवारी 2009 दरम्यान घेतले गेले. विभागीय प्रमुख बंधु के यु मोहन यांनी शिबीराचे अध्यक्षपद भुषविले. या कार्यक्रमाचा उद्देश चेन्नई येथे झालेल्या विभाग व केंद्र प्रमुखांच्या बैठकीतील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करणे हा होता. चेन्नईमध्ये झालेल्या बैठकीचे सुत्र येथेदेखिल अवलंबिले गेले. केंद्रप्रमुखाच्या जबाबदाऱ्या, चरित्र निर्माण, आश्रम, मिशनमधील विवाह, पुस्तकांची विक्री व प्रकाशन सुरक्षा, हिशोब इत्यादी अकरा विषय प्रत्येकी हाताळणाऱ्या 3 मार्गदर्शकांनी भाषणे दिली. हे शिबीर मिशनच्या कार्यकर्त्यांच्या कामामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिने खुपच उपयुक्त ठरले ज्यामुळे त्यांना काम करण्याची एक निश्चित दिशा मिळाली.

## उत्तर कर्नाटक प्रशिक्षक शिबीर



उत्तर कर्नाटक विभागातील प्रशिक्षकांचे शिबीर दि. 25 डिसेंबर 2008 रोजी गुलबर्गा आश्रमात संपन्न झाले. 30 प्रशिक्षकांची या अभ्यासवर्गाला उपस्थिती होती. या कार्यक्रमात विभागीय प्रमुख बंधु राजू काशामपूरकर यांच्या भाषणाचा समावेश होता. या दिवशी झालेल्या कार्यक्रमात कार्याचे सखोल मनन, गटचर्चा, प्रश्नोत्तराचा कार्यक्रम याचबरोबर केंद्रपातळीवरच्या कार्याविषयी चर्चा झाली. उदा. ओपन हाऊस, अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम , पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन , जवळच्या केंद्राच्या बैठकीचा आराखडा आणि अहवाल इत्यादी. सायंकालीन ध्यानानंतर प्रशिक्षकांच्या कार्यासंदर्भात महत्वाचे मुद्दे विशद करणारी गुरुदेवांची ध्वनिमुद्रिका ऐकविली गेली. सर्व प्रशिक्षकांना या शिबीराचा भरपूर फायदा झाला व असे शिबीर दर सहा महिन्यांनी आयोजित करण्याची इच्छा त्यांनी प्रदर्शित केली.



"एक व्यक्ति आणि तिच्या अंतरातील ईश्वर या दोघांमध्ये येणारी केवळ एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे E-G-O, 'इगो' (अहंकार) आणि ज्यावेळेस अहंकाराचा त्याग केला जातो, त्यास फेकून दिले जाते, त्याचे समर्पण केले जाते, त्यावेळेस आपणांस त्याच्याजागी G-O-D (गॉड – ईश्वर) भेटतो." :– चारीजी.

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2

## चारित्र्य निर्माणावर अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम



दि. 4 जानेवारी रोजी, आसाममधील दिग्बोइ केंद्राद्वारे एक पूर्ण दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तिनसुखिया, तेजपूर, सिबसागर, जोरहाट, दुलियाजान, नाहारकाटिया, दिब्रुगड, डूमडूमा या आसाम मधील आणि अरुणाचल प्रदेशातील जवळच्या केंद्रातून आलेल्या सुमारे 200 अभ्यासींनी या कार्यक्रमास हजेरी लावली. गुरुदेवांनी अलीकडेच दिलेल्या भाषणांच्या अनुषंगाने या कार्यक्रमाचा संपूर्ण भर अभ्यासींच्या चारित्र्य निर्माणावर देण्यात आला. बंधु अशोक सेनगुप्ता यांनी सादरीकरण करताना लालाजी महाराजांचा पुढील विचार उद्धृत केला. " माणसाने अध्यात्मिकतेचे शिखर गाठले असले तरी जर तो अनैतिक असेल तर त्याला अध्यात्मिकतेचा स्पर्शसुद्धा झालेला नाही असे म्हणावे लागेल." "गुरुदेव आपल्या अध्यात्मिक प्रगतिसाठी जबाबदार आहेत परंतु आपले चारित्र्य रुपांतरण आणि आपला दृष्टिकोन यासाठी आपणंच जबाबदार आहोत." ही गोष्टसुद्धा अधोरेखित केली गेली. आपल्यामध्ये सकारात्मक बदल सुनिश्चित करण्यासाठी सर्वोच्च महत्वाचे असे बाबूजींचे शब्द म्हणजे "सर्वप्रथम स्वत:शी प्रामाणिक रहा". सादरीकरणानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले ज्यामध्ये प्रामुख्याने तरुणांनी भाग घेतला व त्यापासुन स्फुर्ती घेउन संपूर्ण श्रोत्यांनी त्यांच्या आंतरिक 'स्व' प्रती आपली प्रतिबद्धता व्यक्त केली.

## भद्रावती , कर्नाटक

1922 साली एम विश्वेश्वरैय्या यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात पहिला पोलाद उद्योग जिथे चालू केला त्या भद्रावती शहरात या वर्षी 2 फेब्रुवारीला मिशनचा प्रथम समारोह झाला.

ज्या केंद्राची सुरुवात ऑगस्ट 2008 मध्ये तीन अभ्यासींपासून झाली होती तेथे गुरुदेवांच्या कृपेने, स्थानिक अभ्यासींचा उत्साह , स्वयंसेवक आणि शिमोगा, तिप्तुर, बंगलोर इथल्या प्रशिक्षकांच्या सतत भेटी यामुळे संख्याबळ तीस वर गेले.

समारंभ भगिनी नागमणी यांच्या घरी झाला. तिथे स्थानिक अभ्यासींनी भोजनाची व्यवस्था केली. भगिनी रुपा आणि बंधु प्रमोद यांनी दिवसभराचा कार्यक्रम आयोजित केला ज्यात लालाजी महाराजांवर ध्वनीचित्रफित तसेच गुरुदेवांनी उल्लेखिलेल्या गोष्टी मुकाभिनय करून ओळखणे तसेच त्यावरच्या चर्चा अशा खेळांनी अभ्यासींना पूर्ण दिवस गुंतवून ठेवले.

तरुण स्वयंसेवकांचा उत्साह आणि या नवीन केंद्राच्या अभ्यासींद्वारे आश्रम उभारणीची तळमळ बघून खरोखरच खूप आनंद झाला.

## युवा शिबीर – भविष्याची तयारी



दि. 24 जानेवारी ते 26 जानेवारी दरम्यान, 'भविष्यासाठी तयारी' हे एक तीन दिवसांचे निवासी शिबीर युवकांसाठी बंगलोरमध्ये घेण्यात आले. 18 ते 35 वयोगटातील सुमारे 25 अभ्यासींनी यात सहभाग घेतला. प्रत्येक दिवसाची सुरुवात सत्संग, भाषणे , त्या दिवसासाठी निवडलेल्या विषयांवर चर्चा यांनी होत असे. त्यानंतर सायंकाळी स्वयंसेवक काम करित असत. पहिल्या दिवशी चारित्र्य घडविणे, सांघिक कार्य, बंधुभाव, सहजमार्गाची मूलतत्वे यावर भर देण्यात आला. सर्व अभ्यासींनी आपल्या हृदयात हा संदेश खोलवर साठवून ठेवला.

दुसऱ्या दिवशीच्या सत्रात मिशनच्या वेगवेगळ्या कार्यांची माहिती दिली गेली. त्यानंतर अभ्यासींनी स्वयंप्रेरणेने आणि स्वेच्छेने त्यांनी निवडलेल्या विविध कार्यात भाग घेतला.

तिसऱ्या दिवशी अभ्यासींनी त्यांचे स्वानुभव इतरांना कथन केले तसेच त्यांच्या जीवनात असलेल्या गुरुदेवांच्या प्रभावाची जाणीव सर्वांमध्ये होती. या शिबीरात अभ्यासींनी सादर केलेल्या नाटिका, संघभावना वाढविणारे खेळ आणि आध्यात्मिकतेची जोड असलेले विशेष चित्रपट यांचा समावेश होता. या निमित्ताने आम्हास उत्साहाने भरलेल्या तरुणांपर्यंत, जे मिशनच्या कार्यामध्ये स्वत:ला झोकून देउन कार्य करु शकतात, पोहोचण्याचा एक अत्यंत महत्वाचा मार्ग सापडला ज्यायोगे त्यांच्यातील उर्जेला योग्य दिशेने प्रवाहित करण्यास मदत झाली.

## चंद्रपूर येथील अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

28 डिसेंबर 2008 रोजी महाराष्ट्रातील चंद्रपूर केंद्रातील सर्व अभ्यासींना परिश्रमपूर्वक चांगली साधना करण्यासाठीची आठवण देण्यासाठी हिंदी भाषेत एक अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याचे मुख्य उद्दिष्ट सहजमार्ग साधना व त्यामागील तत्वे सादर करणे हे होते. सत्संग झाल्यानंतर सकाळी पूज्य गुरुदेवांचे हिंदी भाषेतील ' इश्वरसे संबंध जोडो (ईश्वराशी संबंध जोडा) या भाषणाची ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली तसेच मनुष्यजीवनाचे ध्येय , गुरुदेवांची भूमिका, प्रार्थना, ध्यान, सफाई आणि दैनंदिनी लिहिण्याचे महत्व या विविध विषयांवर भाषणे झाली. दुपारच्या सत्रात काही वक्त्यांनी सहजमार्ग साधनेचे विविध अंग यावर त्यांचे विचार मांडले. त्यानंतर अभ्यासींच्या साधनेतील वैयक्तिक गोडी आणि योग्य दृष्टिकोन तपासण्यासाठी एक प्रश्नावली अभ्यासींमध्ये वाटण्यात आली. कार्यक्रमाची सांगता सायंकाळच्या सत्संगाने झाली.



श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2





## मुलांसाठी कार्यशाळा – औरंगाबाद

दि. 18 जानेवारी 2009 रोजी औरंगाबाद येथे मुलांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मौज व ज्ञान यांनी भरलेला दिवस अनुभविण्यासाठी, त्याचप्रमाणे जीवन कसे जगावे हे शिकण्यासाठी 5 ते 12 वयोगटातील 22 मुले यावेळी एकत्र आली होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली; त्यानंतर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या एका सत्रात मुलांनी निसर्गाचे घटक व त्यांचे गुण ओळखले व स्पष्ट करुन सांगीतले. सर्व मुले आपापसात उत्तम प्रकारे मिसळत होती हे पाहून उपस्थितांना आनंद झाला. आशा, चिकाटी व कृतज्ञता याबद्दलच्या गोष्टी मुलांना सांगण्यात आल्या.

## शिक्षकांसाठी मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम – रांची

रांची येथे 3 व 4 जानेवारी 2009 रोजी, दोन दिवसांचा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. झारखंड राज्यामध्ये मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाच्या कार्याची व्याप्ती वाढविणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होता. या कार्यक्रमात एकूण 59 प्रतिनीधींनी भाग घेतला. कलकत्त्यातील मुल्याधारित प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे प्रशिक्षक, बंधू अरुण दवे व भगिनी लीना दवे, विभाग प्रमुख डॉ. जी. एम. भटनागर, बंधू अरुणकुमार लाल व बंधू मनोज तिवारी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रशिक्षकांनी या कार्यक्रमाची बांधणी कशी करावी व तो कशाप्रकारे सादर करावा याबाबत मार्गदर्शन केले. ज्या केंद्रांनी आत्तापर्यंत अशाप्रकारचे कार्यक्रम केलेले नाहीत अशांना या मार्गदर्शनाचे सहाय्य झाले.

योग्य संधी मिळताच मुल्यांबद्दलची शिकवण आपण पसरवली पाहिजे हे या कार्यक्रमाचे प्रमुख सूत्र होते. हा अभ्यासक्रम व त्याच्याशी संलग्न कार्यक्रम मुख्यत्वेकरुन शाळांसाठी असले तरीही, त्याला शाळांपुरते मर्यादित करण्याची गरज नाही. अभ्यासींच्या जीवनामध्ये मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षण विविधांगाने वापरले गेले पाहिजे. बंधू दवे यांनी मुल्याधारित अध्यात्मिक शिक्षण कार्यक्रमाचे खरे आधारस्तंभ असणाऱ्या शिक्षकांना कशी प्रेरणा द्यावी याबाबत आपले विचार मांडले. आपल्याला हळूहळू सर्वांनाच अध्यात्माकडे घेऊन जायचे आहे यावर त्यांनी भर दिला. भगिनी लिना यांनी लोकांशी कश्याप्रकारे बोलावे याबाबत काही सूचना दिल्या. व्यक्तिमत्व विकास आणि संतुलित जीवन याविषयी बंधू मनोज यांनी सादरीकरण केले. संवाद कौशल्य सुधारण्यासाठी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्राच्या भविष्यातील कार्यक्रमांबद्दल चर्चा करण्यासाठी बैठक घेण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना मनोवेधक करण्यासाठी गोष्टी सांगाव्यात व इतर प्रयोग अधिक रंजकतेने, नविनप्रकारे केले जावेत असे यावेळी सुचवण्यात आले. दोन सीडी असणारा "शिक्षक प्रशिक्षण संच" प्रत्येक केंद्राला भेट देण्यात आला.



## तणावाचे व्यवस्थापन व समतोल प्रगती

मध्यप्रदेशातील अनेक केंद्रांमध्ये त्याचप्रमाणे गुरु दत्तात्रेय तंत्रज्ञान संस्था, इंदौर विश्वविद्यालय व इंदौरपासून 200 कि.मी. अंतरावर असणारे राजगढ केंद्र या सर्व ठिकाणी ओपन हाऊस सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. 'तणावाचे व्यवस्थापन व समतोल प्रगती' हा या सत्रांचा विषय होता. यावेळी असे स्पष्ट करण्यात आले की अनियमीत मनामूळे आपण तणाव निर्माण करतो व ध्यानाच्या साधनेने मनाचे नियमन करणे शक्य आहे. आपल्या जुन्या कल्पना व पूर्वग्रह आपल्याला योग्य कृती करण्यापासून परावृत्त करतात. अध्यात्मिकता आपल्याला आंतरिक व बाह्य मागण्यांमध्ये समतोल राखण्यास मदत करते.

यावेळी उपस्थित श्रोत्यांना सहजमार्गाची ओळख करुन देण्यात आली. गुरु दत्तात्रेय संस्थेतील 200 विद्यार्थी व 30 शिक्षक या कार्यक्रमासाठी हजर होते. राजगढ केंद्रातील अभ्यासींनी जवळपास असणाऱ्या खिलचीपूर, कुराबार व बिओरा केंद्रासमवेत समन्वयाने ओपन हाऊस आयोजीत केले होते. हजर असणाऱ्या 125 व्यक्तिंपैकी 35 व्यक्तिंनी साधनेची सुरुवात केली. मुरैना येथील ओपन हाऊस कार्यक्रमासाठी 83 व्यक्ति उपस्थित होत्या; त्यापैकी 33 व्यक्तिंनी साधनेचा प्रारंभ करण्यास अनुकूलता दर्शविली.

## अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सहजमार्गाची ओळख – सोलापूर

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथील अभ्यासी विद्यार्थ्यांनी, बी. आय. जी. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना दि. 19 व 20 जानेवारी रोजी सहजमार्ग साधना पद्धतीची ओळख करुन दिली. प्रत्येक सत्रामध्ये जवळपास 300 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. आपल्या सहजमार्गाच्या तरुण वक्त्यांनी सर्वसाधारणपणे ध्यानाची आवश्यकता व उपयुक्तता तसेच विशेषकरुन सहजमार्ग पद्धतीचे ध्यान हे विषय अतिशय प्रभावीपणे विशद करुन सांगीतले. आपल्याच वयाच्या विद्यार्थ्यांनी स्वानुभावाने व खात्रीपूर्वक सांगितलेल्या गोष्टींबद्दल पूर्ण स्विकृतीची भावना विद्यार्थी श्रोत्यांमध्ये दिसून आली. भाषणानंतर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या सत्रानंतर 126 विद्यार्थ्यांनी साधना सुरु करण्याची इच्छा प्रदर्शित केली. विद्यार्थ्यांना मूलभूत माहितीपत्रके वाटण्यात आलीत व अधिक कुतूहल दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय व्यवस्थापनाच्या सहकार्याने वसतीगृहातच सिटींग्जची व्यवस्था करण्यात आली. या अभूतपूर्व प्रतिसादाने प्रेरित होऊन आम्ही बी. एम. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या संस्थेशी संपर्क साधला व तेथेसुद्धा आमचा प्रस्ताव मान्य झाला. "अधिक काम हेच चांगल्या कामाचे बक्षिस असते" या गुरुदेवांच्या उक्तिप्रमाणे त्यांच्यावरील प्रेमामुळे स्वयंसेवकांनी हे काम स्विकारले आहे.

## अभ्यासींबरोबर संपर्क



चेन्नई येथे जवळ जवळ 8500 नोंदणीकृत अभ्यासी असून मणपक्कम आश्रमात रविवार सत्संगासाठी सुमारे 2500 स्थानिक अभ्यासी उपस्थित असतात. क्रोमपेट उपकेंद्राने 28 डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमास अंदाजे 120 अभ्यासी आले होते. या उपकेंद्रातील सर्व नोंदणीकृत अभ्यासींना या कार्यक्रमासाठी बोलविण्याचे हे फलित होते. यावेळी दोन छोटी भाषणे झाली. प्रथम स्थानिक प्रशिक्षकांनी साधनेबद्दल सांगितले व त्यानंतर एका भगिनीने सहजमार्गाबद्दल आपले अनुभव व त्यामुळे झालेला फायदा याबाबत कथन केले. यानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रामुळे शंका समाधान होण्यास व साधनेबद्दल स्पष्टता येण्यास मदत झाली. त्याचप्रमाणे साधनेपासून लाभ मिळविण्यासाठी नियमीतपणाची गरज अधोरेखित करण्यात आली. या दोन तासाच्या कार्यक्रमाची सांगता सत्संगाने झाली.

"विक्रीपश्चात सेवा" या दृष्टीकोनावर पूज्य गुरुदेवांनी वारंवार भर दिला आहे. आंतरिक गरजेमुळे प्रत्येक अभ्यासी साधनेची सुरुवात करतो. अभ्यासीपर्यंत पोहोचणे व त्याला त्याच्या साधनेमध्ये प्रस्थापित करणे हा त्यांना सहाय्य करण्यातील महत्वाचा टप्पा आहे. या कार्यक्रमामुळे या हेतूची परिणामकारकरित्या पूर्तता झाली.

## वैयक्तिक चारित्र्य हाच अध्यात्मिक जीवनाचा पाया

दि. 13–14 डिसेंबर 2008 रोजी बाबूजी मेमोरियल आश्रम, न्यू पनवेल येथे, बंधू अजय भट्टर यांच्या संकल्पनेनुसार 30 ते 50 या वयोगटातील अभ्यासींसाठी दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

ऑक्टोबर 2008 मध्ये पुण्यात झालेल्या युवा मेळाव्याच्या यशाने तशाच प्रकारचा मेळावा मोठ्या अभ्यासींसाठी पनवेलमध्ये आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली. हा कार्यक्रम म्हणजे व्याख्याने, सामान्यज्ञान चाचणी, खेळ, छोट्या नाटिका, विविध विषयांवरील सादरीकरण यांचे मिश्रण होते. 'फक्त त्यांच्याकडेच बघा', 'चारित्र्य हेच जीवनाचे संरक्षण करते', 'बंधुत्व', 'सहजमार्गाचे तुमच्याद्वारे प्रकटन' आणि 'पात्र ठरण्यासाठी सेवा' या विषयांचा अंतर्भाव या कार्यक्रमात केला गेला होता. पुणे व नाशिक या जवळपासच्या केंद्रांचे अभ्यासीही याप्रसंगी उपस्थित होते.

निरनिराळ्या गोष्टींनी भरलेल्या या कार्यक्रमात 'आत्मनिरीक्षण' व 'दैनंदिनी (डायरी) लिहीणे' यासाठी पूरेसा वेळ देण्यात आला होता. बंधू अजय भट्टर यांच्याशी सल्लामसलत करुन ठरविलेले सर्व विषय एकमेकांशी अश्याप्रकारे जोडले गेले होते की एक विषय आपसूकपणे दुसऱ्या विषयाकडे घेऊन जात होता. या कार्यक्रमाने अभ्यासींवर अशी मोहिनी घातली, की दोन दिवसही त्यांना अपुरे वाटले. अश्याप्रकारचे कार्यक्रम वारंवार व्हावेत या सूचनेने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## उत्तर आंध्रप्रदेशातील कोळसा–पट्टा विभागातील संमेलन

'कोळसापट्टा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उत्तर आंध्रप्रदेशात 50 कि.मी.च्या परिघात मिशनची लहान मोठी केंद्रे आहेत. या विभागातील आश्रम अनेक वर्षांपूर्वी अभ्यासी असलेल्या कोळसा खाणीतील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने उभारले गेले होते. जयपूर केंद्र या प्रदेशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असून आश्रमासाठी 10.5 एकर जागा आहे व त्याभोवती अभ्यासींसाठीच्या वसाहतीचा प्रस्ताव आहे.

रवीवार, दि. 25 जानेवारी रोजी जवळपासच्या केंद्रातील 200 अभ्यासी 'मांचेरियल' मधील प्रशिक्षण संस्थेत पहिल्या सत्संगासाठी हजर होते. उत्तर आंध्रप्रदेशाचे विभागीय प्रमुख इतर काही अभ्यासींसह संमेलनासाठी हैद्राबादहून खास उपस्थित राहिले होते.

मांचेरियलनंतर गोलेटी या नविन केंद्रामध्ये संमेलन झाले. अत्यंत छोट्या काळामध्ये या केंद्राने शुन्यापासून विसापर्यंत अभ्यासीसंख्या वाढविली आहे. स्थानिक खाण व्यवस्थापकांच्या उत्तेजन व सहकार्यामुळे, भविष्यातील कार्यक्रमांसाठी जुन्या इमारतीची डागडूजी करण्यात येत आहे. गोलाटी येथील सत्संगानंतर काही अभ्यासींनी बेलामपल्ले आश्रमाकडे प्रयाण केले. येथील सत्संगासाठी सुमारे 80 अभ्यासी उपस्थित होते. यासर्वांनी एक रात्र गोदावरीखणी येथे घालविली.

दुसऱ्या दिवशी, 26 जानेवारी रोजी गोदावरीखाणी येथील आश्रमात सकाळी 6.30 वाजता सत्संगाचे आयोजन करण्यात आले. उपहारानंतर अभ्यासींनी गोदावरी नदीच्या उत्तरेकडे काही अंतरावर असणाऱ्या आश्रमाला भेट दिली.

पिंपळ व कडूलिंबाच्या सावलीत, नैसर्गिक वातावरणात 10 वाजता सत्संग झाला. पूज्य गुरुदेवांच्या अस्तित्वाने ती जागा भारली गेली होती.

## शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम – जम्मू

दि. 27 डिसेंबर 2008 रोजी जम्मू येथे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दीष्ट अश्या शिक्षकांना घडविणे होते जे समाजाच्या विविध स्तरांमध्ये सहजमार्गाबद्दल बोलू शकतील. जम्मू काश्मिर व हिमाचल प्रदेशातील 24 व्यक्तिंनी (यामध्ये 7 प्रशिक्षक) यासाठी नोंदणी केली होती. प्रत्येक व्यक्तिला एका आठवड्यापूर्वी सादरीकरणासाठी विषय देण्यात आला होता. दिल्लीहून आलेल्या चार प्रशिक्षकांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमात भाग घेणाऱ्या व्यक्तिंना त्यांचे सामर्थ्य, दुर्बलता व सुधारणेला असलेला वाव याबाबत प्रशिक्षकांनी सांगितले. हा प्रशिक्षण कार्यक्रम सहजमार्ग समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त त्याचप्रमाणे अध्यात्मिक लाभ देणारा असल्याचे मत सहभागी अभ्यासींनी व्यक्त केले.




श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
प्रकाशाची केंद्रे
मार्च 2009 केवळ खाजगी वितरणाकरिता खंड 2 अंक 2

## शहाजहाँपूर आश्रम



शहाजहाँपूर आश्रमाची उभारणी हे बाबूजींनी त्यांचे गुरुदेव फतेहगढचे लालाजी महाराज यांच्याप्रती दिलेले एक प्रेमळ योगदान होते. बाबूजींनी या आश्रमासाठी जागा शोधण्यापासून ते आश्रमाच्या उभारणीपर्यंत प्रत्येक गोष्टीत मनापासून रस घेतला. "शहाजहाँपूर – सहजमार्ग साधना पद्धतीचे जन्मस्थान" असे कोरलेला संगमरवरी स्तंभ आश्रमाच्या जागेवर उभारण्याचा आदेश स्वत: बाबूजींनी दिला. शहाजहाँपूर आश्रम रेल्वे स्थानकापासून 8 कि.मी. व बस स्थानकापासून 7 कि.मी. अंतरावर आहे.



शहाजहाँपूर हरदोई रोड व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 24 ज्याठिकाणी एकमेकांना मिळतात तेथे 15 एकर जागेवर शहाजहाँपूर आश्रम स्थित आहे. सन 1973 ते 1976 दरम्यान, बाबूजींच्या देखरेखीखाली आश्रमाचे ध्यानगृह – 'ध्यानकक्ष' उभारले गेले. 5 फेब्रुवारी 1976 च्या बसंत उत्सवात बाबूजींनी हा ध्यानकक्ष त्यांचे गुरु लालाजी महाराज यांना समर्पित केला.

ध्यानकक्षामध्ये एकावेळेस सुमारे 800 अभ्यासी बसू शकतात. याच्या तीनही बाजूंनी बंदिस्त व्हरांडा असून पूर्वेकडे व्यासपीठ आहे. व्यासपीठाच्या मागील बाजूस जाड काचेमध्ये बनविलेले मिशनचे बोधचिन्ह आहे. हे बोधचिन्ह कॅनडामधील एका अभ्यासीने बाबूजींना भेट दिले होते. हे बोधचिन्ह पूर्वेकडे असल्याने उगवत्या सुर्याच्या स्थितीप्रमाणे ते आपले रंग बदलते. हिरव्या रंगाच्या संगमरवराने बनलेली ध्यानकक्षाची फरशी अहमदाबाद जवळील अंबाजी हिल येथून आणण्यात आली होती. नैसर्गिकरित्या हवा खेळती रहावी याप्रकारे ध्यानकक्षाची रचना केलेली आहे. त्यामूळे येथे हिवाळ्यात उबदार तर उन्हाळ्यामध्ये थंडगार वाटते. ध्यानकक्षाच्या सभोवती लाल आग्रा दगडाच्या फरशीत बनलेला ओटा असून भोवतालची भिंत पांढऱ्या आग्रा दगडाने आच्छादलेली आहे.



दोन मजल्यांच्या या साध्या इमारतीत तळमजल्यावर, बंधू व भगिनींसाठी प्रत्येकी एक अशी मोठी खोली आहे. आश्रमाच्या पहिल्या मजल्यावर चौदा खोल्या आहेत. त्यापैकी एक खोली बाबूजींनी त्यांचे पिता रायबहादूर श्री. बद्रिप्रसादजी व दुसरी खोली चारीजींनी त्यांच्या मातोश्री जानकीदेवी यांच्या स्मरणार्थ दान केली आहे.

आश्रमात बाबूजींचे समाधीस्थळ, प्रशस्त स्वयंपाकघर व भोजनकक्षाचा समावेश आहे. ध्यानकक्षाच्या एका बाजूस बाबूजींचे कॉटेज असून दूसऱ्या बाजूला गुरुदेवांचे कॉटेज आहे.



आश्रमाच्या पश्चिम दिशेस, दोन प्रमुख दरवाज्यांच्यामध्ये भव्य कारंजे आहे. कारंज्याच्या त्रिकोणी स्तंभावर लाल दगडाने बनविलेले व तांब्याच्या पत्र्याने वेढलेले मिशनचे बोधचिन्ह आहे. त्याच्या सभोवती रंगीत पाण्याचे फवारे आहेत. कारंज्याच्या चारही बाजूंस असणाऱ्या कमानी त्याच्या सौदर्यात अधिकच भर घालतात.

हिरवीगार पालवी, झाडे, झुडूपे यांनी भरलेला आश्रमाचा परिसर अनेक प्रकारच्या पक्ष्यांना आकर्षित करतो. बाबूजींनी रुजवलेला कदम्ब वृक्ष गेली 33 वर्षे जोमाने वाढतो आहे.







**To subscribe to this Newsletter please visit**
**http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp**
**For feedback, suggestions and news articles please send email to**
**in.newsletter@srcm.org**

© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This Newsletter is intended exclusively for the members of SRCM.